# बै.जी.शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचा ७५ वा स्थापना दिवस

दि.२३ जुन १९४६ रोजी बै.जी.शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची स्थापना झाली. बैरामजी जीजीभॉय यांनी देणगी दिलेल्या जागेवर सन १८७१ मध्ये बै.जी.मेडीकल स्कुल अस्तित्वात आले होते त्याचे रुपांतर २३ जुन १९४६ रोजी महाविद्यालयात झाले. या महाविद्यालयाचा ७५ वा स्थापना दिवस दि.२३ जुन २०२१ रोजी साजरा केला जात आहे. पश्चिम महाराष्ट्रातील प्लेगची साथ असो, स्वाईन फ्ल्युची साथ किंवा कोवीड व म्युकरमायकोसीस याची साथ असो बै.जी.शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाने नेहमीच रुग्णसेवेत सिंहाचावाटा उचलला आहे.

वैद्यकीय क्षेत्रातील संशोधन, रुग्णसेवा व एम.बी.बी.एस, विविध विषयातील स्पेशलायझेशन, सुपरस्पेशालीटी, नर्सींग, व पॅरामेडीकल विद्यार्थ्यांचे हे महाविद्यालय आशास्थान आहे. ७५ वा स्थापना दिवसाचा मुख्य कार्यक्रम मा.उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री ना.श्री.अजित दादा पवार यांच्या शुभहस्ते होणार असून मंत्री वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतीक कार्य मा.ना.श्री.अमितजी देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत व राज्यमंत्री वैद्यकीय शिक्षण मा.ना.श्री.राजेद्र पाटील यड्रावकर, मा.सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्यै विभाग, श्री.सौरभ विजय, मा.श्री.चोकलिंगम, महासंचालक यशदा तथा मुख्य प्रशासक बै.जी. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,पुणे, मा.संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन पद्मश्री डॉ.तात्यारावजी लहाने तसेच सहसंचालक, मा.डॉ.अजय चंदनवाले यांच्या उपस्थितीत साजरा होत आहे.

सदर कार्यक्रम युट्युब चॅनलवर दुपारी २ वाजता उपलब्ध राहणार आहे.

YouTube link - **https://www.youtube.com/watch?v=vI7Mv4J4eBg**

B.J. Govt. Medical College & Sassoon Hospital, Pune
सत्यमेव जयते

अधिष्ठाता
बै.जी.शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व
ससून सर्वोपचार रुग्णालय,पुणे
Dean
B J Govt. Medical College, Pune